Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करताना विद्यार्थ्यांना येणा–या समस्यांचा अभ्यास

*संशोधक नाव*
श्री. किरण बाबुराव लावरे
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षण शास्त्र महाविद्यालय य.च.म.मु.विद्यापीठ अभ्यास केंद्र येवला -54499*

*मार्गदर्शक*
डॉ. भागवत भड
एम.ए.एम.एड.सेट,नेट,पीएच.डी
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षण शास्त्र महाविद्यालय य.च.म.मु.विद्यापीठ अभ्यास केंद्र येवला -54499*

*सारांश*

*शालेय शिक्षणात प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमाचे स्थान महत्वाचे आहे.विविध विषयातील आशयात मानवाचा निसर्ग व समाज यांच्याशी वेळ, काळ व संस्था पातळीवरील आंतरक्रियांचा समावेश असतो.शिक्षणाची वाटचाल दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणाकडे होण्यासाठी शिक्षक पुरोगामी विचारांचा प्रयोगशील, उपक्रमशील व गतिमान असावा लागतो. प्रगती हे जीवनाचे ध्येय असते, तर गती हा त्याचा आत्मा असतो.*

*आजच्या स्पर्धात्मक युगात आपले मुल सर्वगुणसंपन्न व्हावे व स्पर्धा परीक्षेत उत्तम यश मिळवावे अशी पालकांची अपेक्षा असते.शिक्षण ही सतत चालणारी अखंड प्रक्रिया आहे.परंतु जीवनाला स्पर्श करणारी एक विचारधारा आहे . म्हणुन शिक्षणाचा विचार आणि शिक्षणाची व्यवस्था यांच्या संबंधातील गुणवत्ता विद्यार्थी दशेत विविध स्तरावर त्या त्या वेळीच जोपासने अगत्याचे ठरते.*

*शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या विचार प्रक्रियेला, आकलन क्षमतेला तसेच बौद्धिक क्षमतेला चालना देण्यासाठी अभ्यासक्रमावर आधारित विविध परीक्षा घेतल्या जातात.या परीक्षेबरोबरच विद्यार्थ्यांना आव्हानात्मक स्पर्धा परीक्षेसाठी तयार करण्यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे हे मंडळ प्राथमिक स्तरापासून उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा, राज्य व राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षांचे आयोजन करतात.या परीक्षेतील प्रश्नांच्या काठीण्य पातळीला सर्वोच्च्य प्राधान्य देऊन विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचा उद्देश असतो.शालेय जीवनात चाचण्या, सत्र परीक्षा घेण्यात येतात. त्याचबरोबर शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय परीक्षा इत्यादी स्पर्धात्मक परीक्षांची आयोजन करण्यात येते.*

*संशोधक ज्या शाळेत अध्यापनाचे काम करतात त्याच शाळेतील विद्यार्थ्यांनी केलेल्या चुका निदर्शनास आल्या.या उद्देशाने संशोधकाने प्रस्तुत समस्या हाती घेतली होती. अंबिका माध्यमिक*

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

*विद्यालय, आंबड ता.अकोले येथील इ. ५ वीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करताना येणा–या समस्यांचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी प्रस्तुत संशोधन अहवाल तयार करण्यात आला.*

Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**महत्वाचे शब्द्–** 1. शिष्यवृत्ती परीक्षा, 2.ग्रामीण भाग, 3. इयत्ता पाचवी, 4.उपक्रम

**संशोधन लेखाचा मुख्य भाग–**

सर्व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी त्याच्यावर योग्य संस्कार होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी विविध पैलूंचा त्यात विकास होणे अपेक्षित असते. शैक्षणिक वर्ष 2015–16 मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे विद्यार्थ्यांच्या प्रगतीच्या दिशेने वाटचाल निश्चित करण्यासाठी अनेक सकारात्मक बदल शिक्षण व्यवस्थेत घडून आणण्याचे प्रयत्न केले गेले. 22 जून 2015 च्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासकीय निर्णय प्रसिद्ध झाल्यानंतर 100: मुले प्रगत झालेली पाहिजे. असा आदेश प्राप्त झाला. शिक्षण पद्धती कोणतीही असो मुले शिकले पाहिजेत या एका वाक्याने विविध शैक्षणिक पद्धतीने दैनंदिन शिक्षणात मानाचे स्थान मिळाले .

**शिष्यवृत्ती परीक्षेची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

परिचय शिष्यवृत्ती परीक्षा ही महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाद्वारे घेतली जाणारी परीक्षा आहे. या परिक्षेचा उद्देश गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करणे तसेच त्यांच्या शैक्षणिक क्षमतेला चालना देणे आहे.

1) महाराष्ट्र राज्यातील शिष्यवृत्ती परीक्षेची स्थापना – महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने 1954 मध्ये प्राथमिक स्तरावर पहिली शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली.त्यावेळी ही परिक्षा इयत्ता चौथी व सातवीसाठी होती.

2) सुरुवात आणि उद्देश – महाराष्ट्र राज्यात शिष्यवृत्ती परीक्षेची सुरुवात ब्रिटीश काळात झाली होती. तत्कालीन शिक्षण व्यवस्थेत गरीब आणि गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या परीक्षेची संकल्पना मांडण्यात आली.स्वातंर्त्य भारतातही या संकल्पनेला चालना देण्यात आली आणि राज्यशासनाने नियमितपणे या परीक्षा आयोजित करण्यास सुरुवात केली.

3) परीक्षेचे स्वरूप आणि अभ्यासक्रम –

पेपर– पेन्सिल आधारित परीक्षा – त्या काळात संपुर्ण परीक्षा लेखन स्वरूपात घेतली जात असे.

प्रश्नसंच रचना – परीक्षेमध्ये गणित , मराठी भाषा आणि सामान्य ज्ञान (बुद्धिमत्ता चाचणी

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

नव्हती) यावर भर दिला जात असे.

गणित विषय कठीण असायचा , कारण त्यात संपुर्ण उत्तरासह गणनात्मक प्रश्न असायचे.

गुणांकन पध्दत, उत्तरपत्रिका हस्तलिखित स्वरूपात तपासल्या जात.त्यामुळे मानवी चुका होण्याची शक्यता होती.

4) परीक्षा आयोजन आणि व्यवस्थापन –

अर्ज प्रक्रिया ऑफलाईन होती.विद्यार्थ्यांना शाळांमार्फत अर्ज भरून द्यावे लागत असे.

प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका हाताने तपासल्या जात त्यामुळे निकाल लागण्यास बराच वेळ लागत असे 6 महिने किंवा त्याहून अधिक कालावधी लागत असे.

5) ग्रामिण आणि शहरी भागातील स्थिती रू– शहरी भागातील विद्यार्थ्यांना माहिती असायची त्यामुळे त्यांचा सहभाग अधिक असे याउलट ग्रामीण विद्यार्थ्यांचा सहभाग त्या तुलनेने कमी असायचा.

**शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थांच्या सहभागाचे प्रमाण कमी असण्याची कारणे –**

1) काही पालक आणि विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेच्या उपलब्धतेबद्दल किंवा तिच्या फायद्यांबद्दल अनभिज्ञ असतात त्यामुळे ते परीक्षेसाठी अर्ज करण्यास तयार होत नाहीत.

2) ग्रामीण किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागांमध्ये विद्यार्थ्यांना परीक्षेची तयारी करण्यासाठी आवश्यक साधने, मार्गदर्शन किंवा कोचिंग सुविधा यांचा अभाव असतो.

3) काही कुटुंबांना परीक्षेच्या अर्ज शुल्क, तयारीसाठी लागणारे साहित्य किंवा कोचिंगसाठी खर्च करणे शक्य नसते.

4) विद्यार्थ्यांना परीक्षेची पातळी कठीण वाटू शकते ज्यामुळे ते आत्मविश्वास कमी होऊन परीक्षेस बसण्यास टाळाटाळ करतात.

5) काही शाळांमध्ये शिष्यवृत्ती परीक्षेच्या बाबतीत प्रोत्साहन, तयारी, उपक्रम घेतले जात नाही त्यामुळे विद्यार्थांचा सहभाग कमी राहु शकतो.

6) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान आणि इंटरनेट सुविधा मिळत नसल्याने त्यांच्या सरावामध्ये मर्यादा येतात त्यामुळे त्यांना अपेक्षित संपादन करता येत नाही.

पुर्वप्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा 80 वर्षापासून शासनामार्फत घेण्यात येत आहे.या परीक्षेबद्दल एक प्रकारचे कुतुहल पालक, शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये निर्माण झाले आहे. दरवर्षी या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थांची संख्या वाढतच आहे.मात्र उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थांची संख्या मात्र अतिशय अल्प असते.विशेतरू गणित व बुद्धिमत्ता चाचणी तसेच भाषा यांसारख्या मुलभूत विषयांमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी अनुत्तीर्ण होतात.ही चिंतनीय बाब आहे. विद्यार्थांना प्रत्येक विषयाचे स्पष्टीकरण

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

सोप्या भाषेत करण्यामध्ये अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते. विद्यार्थ्यांना ज्ञान , आकलन क्षमतेचे मूल्यमापन या परीक्षांद्वारे चांगल्या प्रकारे येते.बुद्धिमत्ता चाचणी हा विषय विद्यार्थांसाठी नवीन असल्यामुळे बहुतांश मुलांना हा विषय अवघड वाटतो.या विषयाचे अध्ययन करताना व प्रश्नपत्रिका सोडविताना अनेक अडचणी येतात.हे समजून घेऊन विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्या दुर करून त्यांच्या गुणातील दर्जा सुधारतो.त्या सोबतच इंग्रजी विषयात सुद्धा विद्यार्थी अनेक प्रकारच्या चुका करताना आढळून आले.बालकांचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षणाचे मुख्य ध्येय आहे .

**शिष्यवृत्ती परीक्षेची सद्यस्थिती –**

सर्वांगीण विकास म्हणजे शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक, क्रियात्मक, आंतरक्रियात्मक विकास होय.या सर्वांगाचा विकास करण्याचे साधन म्हणजे शिक्षण आहे. विद्यार्थ्यांना बुद्धिमत्ता चाचणीत सशक्त बनविणे ही काळाची गरज आहे. बौद्धिक क्षमता, आकलन शक्ती तसेच विचार प्रवृत्त करणारे प्रश्न असतात. केवळ घोकंपट्टी करून शिष्यवृत्ती परिक्षेला यश मिळत नाही .या परीक्षेला लाखोंच्यावर संख्येने विद्यार्थी बसतात परंतु यश मात्र अल्प विद्यार्थ्यांच्या पदरी पडते .

1) शिष्यवृत्ती परीक्षा आयोजनातील बदल रू– शासननिर्णय 29 जून 2015 नुसार राज्यात कार्यान्वित असलेल्या शिष्यवृत्तीचा स्तर इयत्ता चौथीऐवजी पाचवी व इयत्ता सातवी ऐवजी आठवी करण्यात आला.

2) परीक्षेचे दोन टप्पे – 1.प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा ( इयत्ता पाचवी )

2. पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा ( इयत्ता आठवी )

3) पात्रता आणि अभ्यासक्रम–

परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मान्यता प्राप्त शाळेत शिकत असणे आवश्यक आहे.

परीक्षेचे दोन विभाग – पेपर 1(भाषा व गणित) ,पेपर 2 (इंग्रजी व बुद्धिमत्ता)

4) परीक्षा नियोजन आणि अंमलबजावणी –

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ( MSCE ) , पुणे ही संस्था परीक्षेचे नियोजन आणि आयोजन करते.

परीक्षा नोंदणीपासून निकाल जाहीर होईपर्यंत संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने करण्याचे काम शासन करते.

परीक्षा बहुपर्यायी स्वरूपात घेतली जाते.

5) ग्रामीण आणि शहरी भागातील विभिन्नता – शहरी भागातील विद्यार्थ्यांना विविध सुविधा उपलब्ध असल्याने त्यांना चांगल्या प्रकारे यश संपादन करता येते.याउलट ग्रामीण भागातील

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन , उपक्रम , तंत्रज्ञान सुविधा ,सराव , पालकांची उदासीनता इत्यादी समस्यांना सामोरे जावे लागते.त्यामुळे त्यांना शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करताना अनेक समस्या येतात.

शाळांमध्ये ज्ञानरचनावादी पद्धतीने शिक्षण झाले आहे. विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरावर भाषा गणित व इतर विषयातील बऱ्याच संकल्पना त्यांच्यामध्ये रुजवण्याचा प्रयत्न होऊ लागला. विद्यार्थ्यांनी विद्यार्थी अध्ययन अध्यापन प्रक्रियेत आनंदाने सहभागी होऊन विविध शैक्षणिक क्षमता व कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात केले परंतु प्रत्येक पायरीनंतर निर्माण होणारा प्रश्न म्हणजे मग पुढे काय या प्रश्नाचे सराव हा पर्याय पुढे आला आणि हा सराव करण्यासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व आवश्यक शैक्षणिक साहित्य यांची आवश्यकता असते. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेतील विषयांचे मार्गदर्शन मिळणे आवश्यक असते .त्यांना त्याचा अभ्यास करताना कोणकोणत्या अडचण येतात त्याची माहिती होणे गरजेचे असते. मग त्यानुसार त्या समस्या सोडविण्यास मदत होते या सगळ्या पार्श्वभूमीवर सदर संशोधन कार्य संशोधकाने हाती घेतले होते.

शासनाची भुमिका केवळ परीक्षा घेण्यापुरती मर्यादित नसून विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देणे, परीक्षेची पारदर्शकता राखणे, डिजिटल प्रणालीचा अवलंब करणे आणि गरजू विद्यार्थ्यांपर्यंत संधी पोहोचविणे यासाठी शासन विविध पातळ्यांवर प्रयत्नशील आहे.

## संदर्भ सूची

1. बापट, भा. गो. (1975). शैक्षणिक संशोधन. पुणे : नूतन प्रकाशन
2. भिंताडे वि.रा. (1994) शैक्षणिक संशोधन पद्धती. पुणे : नूतन प्रकाशन
3. देशपांडे प्रकाश आणि पाटोळे एन.के. (1994) संशोधन पद्धती, य.च.म.मु.वि.नाशिक
4. मुळे रा.श.आणि उमाठे, वि. तू. (1977) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे : नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ
5. प्रधान हेमचंद्र (2004), विज्ञान शिक्षण नव्या वाटा, ग्रंथालाय प्रकाशन, मुंबई.
6. तांबे चं. तु. (2010), शिक्षण तरंग, वर्ष दुसरे, अंक 7 वा, इनसाईट प्रकाशन, नाशिक